म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय [illegible]
दा. क्र. १५५६३




शिवशाही

# महाराष्ट्रधर्म वाढवावा

प्रा. भालबा केळकर



IRBK-0115563





नाटयरूप शिवशाही

नाटिका ७ वी

संपादक : डॉ. म. वि. गोखले

# 'महाराष्ट्रधर्म वाढवावा'

(स्त्रीपात्र विरहित ऐतिहासिक नाटिका)


म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.

दा. क्र. ५५५८३ नों. दि. २-५-१९७४

वि. ८१.१७२ क्र. ...............


लेखक

प्रा. भालबा केळकर


IRBK-0115563



प्रकाशन क्रमांक १५४

किमत १ रुपया

या नाटिकेचा प्रयोग व भाषांतर, रूपांतर, आकाशवाणी किंवा चित्रवाणी यासाठी उपयोग करण्यापूर्वी लेखकाची आगाऊ परवानगी घेणे आवश्यक आहे. एका प्रयोगाचे मूल्य रु. पंधरा फक्त.

पत्ता :– प्रा. भालबा केळकर, 'प्रमथेश' ७५९/१०० डे. जिमखाना, पुणे ४.

प्रकाशिका : सौ. निर्मला नारायण अरगडे, सौ. मालिनी माधव कुलकर्णी
अरगडे कुलकर्णी प्रकाशन १६/२२४ लोकमान्यनगर, पुणे ३०

© सर्व हक्क प्रकाशिकेंच्या स्वाधीन

प्रथमावृत्ती : जून १९७४

मुद्रक : सौ. वसुधा रघुनाथ खरे, अक्षर मुद्रणालय, ४७ इंडस्ट्रियल इस्टेट,
नागरगाव, लोणावळा (जि. पुणे)

नाट्यवेड्या बालमित्रांनो,

हा जून १९७४ ! म्हणजे ठीक ३०० वर्षापूर्वी (जून १६७४ मध्ये) महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला चेतना देणारी एक महान घटना घडली ! श्रीशिवाजीराजे यांनी हिंदवी राज्याची मुहूर्तमेढ रोवून स्वतःला राज्याभिषेक करून घेतला. हिंदवी स्वराज्याचा हा छत्रपती म्हणजे गुणसागरच होता !

जाणिवेच्या रवीला रसिकतेचा दोर लावून या श्रीशिवचरित्ररूपी गुणसागराचे मंथन केले तर नानाविध गुणांचे नवनीत घुसळून वर येते. साहस, शक्ती, युक्ती, न्यायप्रियता, शिस्तप्रियता, दूरदर्शीपणा, नीतिमानता, संस्कारक्षमता—किती किती म्हणून त्यांचे गुण सांगावे !

अशा या लोकोत्तर पुरुषश्रेष्ठाच्या चरित्रातील निवडक प्रसंगाचे नाट्यरूप दर्शन घडवून, त्यांच्या विविध गुणांचा परिचय आमच्या बालमित्रांना करून द्यावा, यासाठी ही **'नाट्यरूप शिवशाही'** निर्माण केली आहे. रंजनाबरोबरच ध्येयसिद्धी असा हा योग आहे. तुम्हाला तो आवडेलच आवडेल !

१९/२७७, लोकमान्यनगर
पुणे ३०
जून १९७४

सूत्रधार—नाट्यरूप शिवशाही

## – पात्र परिचय – (प्रवेशानुक्रमे)

दादोजी कोंडदेव (कारभारी)

शिवाजी महाराज

बाबाजी (नरसीबाबा, रोहिडेश्वरवासी)

दादाजी (बाबाजींचा मुलगा)

येसाजी कंक

मुधोजीराव निंबाळकर

तानाजी मालुसरे

बहिर्जी नाईक

बजाजी निंबाळकर

गंगाधरशास्त्री

काशिनाथपंडित

धुरंधरशास्त्री

बाळंभट

# 'महाराष्ट्रधर्म वाढवावा'

(पडदा उघडतो तेव्हा रंगभूमीवरील मराठेशाही महाल उजळतो. मागील बाजूला महिरपी ऐतिहासिक वास्तूतली खिडकी. त्या खिडकीसमोर एक आसन व लोड. आसनाशेजारी एक नक्षीदार तिवई. इतरही यथायोग्य जागी आसने, सर्वांवर मखमली आच्छादने लोड. तिवईवर एक तलवार म्यान्यासकट आडवी ठेवलेली.)

(पडदा उघडतो त्यावेळी शिवाजी महाराज सचिंत मुद्रेने येरझारा घालीत आहेत. दादोजी कोंडदेव बाजूला मेजासमोर खाली बैठकीवर बसून काही कागदपत्रे पहात आहेत आणि मधून मधून काही लिहीत आहेत. मधूनच सचिंत मुद्रेने येरझारा घालणाऱ्या शिवाजी महाराजांच्याकडे दृष्टिक्षेप करीत आहेत. काहीतरी विचारण्याचा निश्चय करून मध्येच बोलण्यासाठी तोंड उघडून पुन्हा न बोलताच मान हालवून आपल्या कामात मन गुंतवत आहेत. शेवटी न राहवून ते विचारतातच–)

**दादोजी** : राजे! आज एवढे सचिंत का? अस्वस्थ का?

**शिवाजी** : आमचा उद्योग आणि त्यातील अडीअडचणी हीच आमची चिंता.

**दादोजी** : आपणास आम्ही थोरल्या महाराजांचं पत्र दाखवून आधीच ताकीद दिली होती. थोरल्या महाराजांनी आपल्याला पुणे प्रांती पाठवलं ते जहागीर सांभाळण्यासाठी. आदिलशाहीविरुद्ध पुंडाई करून बादशहांची इतराजी ओढवून घेण्यासाठी नव्हे, हे आम्ही आपल्याला आवर्जून सांगितलं होतं. पण–

**शिवाजी** : पण आम्ही ते बुद्धयाचं ऐकलं नाही. आमच्या स्वराज्यस्थापनेचा प्रयत्न तसाच पुढे चालू ठेवला म्हणून पंत तुम्हीही आमच्यावर नाराज झाला आहात हे आम्ही जाणतो.

**दादोजी** : आमच्या राजी नाराजीला काय महत्त्व आहे राजे ! आम्हाला काळजी वाटते ती आदिलशाही सामर्थ्यापुढे आपल्या होणाऱ्या भावी वाताहतीची.

**शिवाजी** : आणि त्या संभाव्य वाताहतीच्या भीतीनं आम्ही आत्ता होणारे स्वकीयांवरचे यवनी अत्याचार सहन करावे. महाराष्ट्रधर्माची चाललेली परवड उघड्या डोळ्यांनी पहात आमची जहागीर उपभोगत बसावं असं तुमचं म्हणणं?

**दादोजी** : नाही राजे ! असं आमचं म्हणणं नाही. आपण तोरणा घेतलात. तिथं गुप्तधन मिळाल्यावर आम्हीच म्हणालो ना की बरं झालं अडचणीच्या वेळी तुमच्यावर लक्ष्मी प्रसन्न झाली. देवानं देणं दिलं आहे. तो खर्च करायला तुम्ही मुखत्यार आहात.

**शिवाजी** : मग ? अजूनही आमच्या कार्याबद्दल नाराजीची भाषा का ?

**दादोजी** : पण आमचं म्हणणं, की सारे अंदाज बांधून पाऊलं पुढे टाका, आणि काम उभारा. आपण फार वेगानं कामं करता आहात. ती सर्व आदिलशाही सामर्थ्यापुढं टिकून आपलं स्वराज्य स्थापनेचं कार्य सुरक्षितपणे तडीला जाईल अशी वेळ यायला अजून अवकाश आहे. म्हणून जरा धीमेपणानं पावलं टाका. अजून आपल्याला स्वकीयांचासुद्धा विरोध आहे, निदान पूर्ण पाठिंबा नाही.

**शिवाजी** : पंत ! तुमच्या सदिच्छेबद्दल शंका नाही. तुमच्या आशीर्वादावर आणि मान्यतेवर तर आम्ही सारा उद्योग जास्त जोमानं उभा केला आणि दुर्गा देवीच्या डोंगरावर राजगड बांधायला सुरवात केली. शस्त्रे घेतली, बंदुका खरीदल्या आणि–

**दादोजी** : या खलित्याचं संकट ओढवून घेतलंत.

**शिवाजी** : कोणता खलिता ? तुम्हाला येवढं घामाघूम करणारा खलिता, भीतीनं थरथर कापायला लावणारा खलिता तरी कोणता ? वाचा मोठ्यांदा

म्हणजे त्या खलित्याच्या आदरार्थ आम्हीसुद्धा थोडं भीती वाटल्यासारखं दाखवू.

**दादोजी** : राजे, सर्वच गोष्टी थट्टेवारी नेऊन आपला हट्ट पुरा करण्याची तुमची पद्धती आज अंगलट आली आहे. ऐका–(वाचू लागतात)

'वजारतमाब सिवाजीराजे फरजंद शहाजीराजे याणे शहासी बेईमानी करून तुझे खोरियात रोहिडेश्वराचे डोंगराचे आश्रयाने पुंडावेयाने मावळे वगैरे लोक जमाव केला आणि तेथून जाऊन पेशजी किल्ल्यावरील ठाणे उठवून आपण किल्ल्यात शिरला...'

**शिवाजी** : हो मग ? हे सारे आम्ही केलं नाकबूल करतो आहोत कुठं ?

**दादोजी** : पुढे ऐका– 'हा सारा पुंडावेया थांबवावा. त्वरित थांबवा हे न जालियास...'

**शिवाजी** : (हसत) हे न जालियास काय होईल ?

**दादोजी** : हसू नका राजे ऽऽ ! बाब गंभीर आहे–हे न जालियास खुदावंत शहा तुजला विजापुरी नेऊन गरदन मारतील व जमेदारी हककानू चालणार नाही, हे मनी समजणे आणि दिवाणात रुजू राहणे...'

**शिवाजी** : म्हणजे हे पत्र आहे कुणासाठी ?

**दादोजी** : नरसीबाबांसाठी. तुम्हाला त्यानी तुमच्या कार्यात पाठिंबा दिला आणि हा प्रसंग ओढवून घेतला. तुमच्या या कार्यात स्वकीयांचीच...

**शिवाजी** : गरदन मारली जाणार आणि आम्ही सहीसलामत सुटणार असं तुमचं म्हणणं पंत ? पण आम्ही तर अनेक वेळा आमचा जीव जातीनं धोक्यात घातला तेव्हा तुम्हीच आमच्यावर रागावलात...

**दादोजी** : होय ! कारण विनाकारण जीव धोक्यात घालून......

**बाबाजी** : (प्रवेशत) स्वराज्य स्थापण्याचा उद्योग आम्हासही कधी कधी अयोग्य वाटतो.

**दादोजी** : अयोग्यच आहे. वेळ अजून आली नाही. तरी तुमचा काळ मात्र आज तुम्हाला या धमकीच्या पत्रानं खुद्द बादशहानी आपल्यासाठी धाडला आहे. वाचा–(बाबाजी पत्र वाचताना थरथरू लागतात.)

**शिवाजी :** बाबाजी, एकंदरीत तुमची धडगत दिसत नाही. आमच्या महाराष्ट्र-धर्म वाढवण्याच्या कार्याचं तोरण बांधायला मदत केल्याबद्दल तुमची गर्दन तुम्ही गमावणार.

**बाबाजी** : राजे ! शाही फर्मान म्हणजे तुम्हाला काय थट्टा वाटते ? उद्या घरादारावरून गाढवाचे नांगर–

**शिवाजी :** बाबाजी ! जसा तुमचा दादाजी तसा मी ! तुमच्या घरादारावरून गाढवाचे नांगर फिरतील तेव्हा आम्ही त्यातून वाचलेले असू ? रोहिडेश्वरी आपण शपथेत गुंतलो आहोत. आम्ही आपणास अंतर देणार नाही.

**बाबाजी** : राजे ! मी म्हातारा ! आता माझी काळजी कसली ?

**दादाजी :** (प्रवेशून) आणि बाबाजी आमचीही काळजी ती कसली ? तुमचे आशीर्वाद असले म्हणजे हिंदवी स्वराज्याचे मनोरथ पुरवणारा तो रोहिडेश्वर समर्थ आहे. श्रींच्या मनातच स्वराज्य व्हावं असं आहे. त्यावर आमची निष्ठा आहे.

**शिवाजी** : बघितलंत बाबाजी! असे दादाजीसारखे अनुयायी असताना आम्ही केवळ या खलित्यांना भिऊन आपला उद्योग थांबवावा?

**दादोजी :** पण आदिलशाहीशी टक्कर ही काय सामान्य गोष्ट आहे ? राजे, तुम्हा मुलांना नुसतं मिसरूड फुटू लागलं आहे. आमचे अनुभवानं पांढरे झाले आहेत.

**शिवाजी** : पंत ! श्रीकृष्ण गोकुळातून मथुरेत गेले तेव्हा श्रीकृष्णाचं वय काय होतं ? श्रीरामानी विश्वामित्राच्या यज्ञाचं राक्षसांपासून रक्षण केलं तेव्हा श्रीरामांचं वय काय होतं ? अभिमन्यूनं पराक्रम केला तेव्हा त्याचं वय...

**दादोजी** : राजे! या देवादिकांच्या गोष्टी!

**शिवाजी :** म्हणूनच त्या आम्हाला आदर्श ! मासाहेबांनी आम्हाला रामायण –महाभारत शिकवलं ते काय फुकटच ? यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति त्या वेळीच कुणाच्या तरी मनात धर्मसंस्थापनेचा विचार उभा रहातो तो या देवांच्या प्रेरणेनंच. बाबाजी, तुम्हाला शाही फरमानाची येवढी धास्ती पडली असेल तर–

**बाबाजी** : माफी मागू? स्वतःच्या जिवासाठी? स्वराज्य स्थापनेच्या सुरवातीला तुम्हाला हा अपशकून करायला या बाबाजीची म्हातारी हाडं पुढं सरसावतील असं तुम्हाला कसं वाटतं राजे?

**दादोजी** : म्हणजे बाबाजी! तुम्हीसुद्धा राजांना चार समजुतीच्या गोष्टी सांगणार नाही? त्या खलित्याचा धाक तुम्हालाही वाटत नाही?

**बाबाजी** : शाही खलित्याचा धाक बाळगून स्वकीयच जर राजांच्या प्रयत्नांकडे पाठ फिरवू लागले तर दुर्दैवच म्हणायचं. राजांच्या मागे देव उभा आहे पंत. स्वकीयांनीही त्यांच्या पाठीशी उभं राहिलं पाहिजे.

**दादाजी** : बाबाजी, आपण म्हणता ते खरं असलं तरी सारेच स्वकीय काही सारखे नाहीत. आजच आम्ही वार्ता घेऊन आलो आहोत की...

**शिवाजी** : वार्ता! मामासाहेबांची असेल बहुधा! आम्ही त्यांना भेटलो त्याच वेळी आम्हास शंका आली होती. म्हणूनच आम्ही सचिंत आहोत पंत! दादाजी, काय वार्ता आहे?

**दादाजी** . राजे! परकीयांबरोबरच नव्हे तर आप्त स्वकीयांबरोबरही विरोध करावा लागणार असं दिसतंय.

**शिवाजी :** म्हणजे मामासाहेबच आमच्याविरुद्ध शत्रू म्हणून उभे ठाकताहेत.

**दादाजी** : होय! आपण रोहिडेश्वरी केलेली स्वराज्यसंस्थापना त्यांना फारच टोचली.

**शिवाजी** : टोचणारच! आदिलशाहीचे इमानी सेवकच ना ते.

**दादाजी** : त्यांनी मावळात फिरून आपल्याविरुद्ध चिथावणी दिली आहे.

**शिवाजी** : ते आम्हाला कळलं म्हणूनच आम्ही फलटणकडे स्वार पाठवले आहेत. आम्ही तिकडच्या बातमीची वाट पहात आहोत. अजून काही बातमी नाही म्हणूनच आम्ही सचिंत आहोत.

**दादोजी** : आणि त्यांनी दाद दिली नाही तर?

**शिवाजी** : आम्ही स्वत च निघणार आहोत. भोसले काय आहेत हे निंबाळकरांना कळलंच पाहिजे.

**दादोजी** : राजे! कृपा करा आणि सामोपचारानं घ्या! डोक्यात राख घालू

नका ! भोंसले–जाधवांच्या वैरातून दोन्ही घराणी धुळीला मिळण्याची वेळ आली होती. आपण नाती जोडली आहेत, मुधोजीरावांची लेक सईबाई-साहेब सून करून घेतली ती आधारासाठी, वैरासाठी नव्हे.

**शिवाजी** : पण आमच्या स्वराज्यसंस्थापनेच्या बाबतीत विरुद्ध जाऊन त्यांनी आगळीक केली आहे.

**दादोजी** : राजे ! निंबाळकर आदिल शाहीचे मातब्बर सरदार आहेत. त्यांच्याशी वैर टिकवणं फार जड जाईल. आणि तुमच्यासारख्या आप्तांशी वैर करूनही सोयरीक असल्यामुळं शाही इतराजीही त्यांना सोसावी लागेल.

**शिवाजी** : म्हणून आम्ही स्वस्थ बसावं ! हात बांधून त्यांना शरण जावं ! शाही फरमान यायच्या आत–

**दादोजी** : तसं नाही पण वैर मिटवायचा प्रयत्न करा! ते तुमचे श्वशूर आहेत याची जाणीव ठेवा.

(बाहेर गलका ऐकू येतो)

**शिवाजी** : दादाजी! पहा कशाबद्दल एवढा ओरडा झाला तो!

**बाबाजी** : राजे! आपण पाठविलेल्या स्वारांनी मुधोजीरावांची काही आगळीक तर केली नाही ना? वडिलांचे आशीर्वाद गमावू नका. तेच...

**शिवाजी** : बाबाजी! आपला उपदेश हा कधी विसरण्यासारखा नाही. पण प्रसंगी मामासाहेबांसारखे स्वकीयच जर–

**दादोजी** : (प्रवेशून) निंबाळकरांना आपल्या स्वारांनी गिरफदार करून आणले आहे.

**दादोजी** : मुधोजीरावांना गिरफदार करून? राजे ऽऽ...

**शिवाजी** : पंत! अगदी नाइलाज झाला असेल तेव्हाच आमचे स्वार असे करतील. उगाचच कोणाचा अवमान करावा, अशी आमची त्यांना शिकवण नाही.

(मुधोजीरावांना घेऊन येसाजी येतो.)

(मुधोजीराव अत्यंत संतापलेले दिसतात. ते आढ्यतेनेच शिवाजी महाराजांपुढे उभे राहतात.)

**शिवाजी** : (त्याना मुजरा करतात) मामासाहेब! आपणाला आम्ही निरोप पाठवला होता की आम्हास आपल्याला भेटायचं आहे म्हणून. आम्ही आपणाकडे भेटायला येऊन गेलो पण आपण निघून गेल्याचं कळलं म्हणून मामीसाहेबांचा आशीर्वाद घेऊन आम्ही परतलो. आणि आपल्याला आणण्यासाठी स्वार पाठवणं आम्हाला भाग पडलं. येसाजी! मामासाहेब कुठं मिळाले?

**येसाजी** : तीन कोसावर! फलटणपासून तीन कोसावर! म्हणून येवढा विलंब लागला.

**शिवाजी** : काही हातघाई झाली?

**बाबाजी** : आणि झाली असली तर योग्य झालं नाही.

**येसाजी** : नाही, बाबाजी! आम्ही केवळ चारी बाजूंनी मामासाहेबाना घेरलं. ते आपसूक आमच्या स्वाधीन झाले. त्याना आम्ही राजांचा निरोप सांगितला. तेव्हा हातघाई टळली.

**शिवाजी** : मामासाहेब! इतक्या तातडीनं फलटण सोडण्याचं कारण?

**मुधोजी** : आपण चालवलेले उद्योग. आपली सोयरीक आमच्या गळ्याला तात लावील असं वाटू लागलं तेव्हा बजाजीला आधीच विजापूर दरबारी पाठवून आम्हीही तीच वाट धरली.

**शिवाजी** : पण आमच्या विरुद्धच तक्रार करायची होती तर विजापूरपेक्षा पुणं जवळ होतं. आणि बादशहांपेक्षा मासाहेब आणि सई जवळच्या होत्या.

**मुधोजी** : अंतरानं पुणं आणि सोयरिकीनं माणसं जवळची होतात असं राजे! हिताहिताची जाणीव तिथं असायला हवी. तुमच्या या उद्योगाची झळ आम्हाला लागेल असं आम्हाला वाटलं तेव्हाच आम्ही बजाजीला आपल्या नादी न लागण्याचा सल्ला देऊन विजापूर दरबारी पाठवला. आणि आतड्याची मायाही तोडून आम्हीही विजापुरी निघालो.

**शिवाजी** : (तीव्र स्वरात) मामासाहेब! स्वार्थी भावनेच्या भरात आपण मासाहेबांचा आणि सोयरिकीनं आमच्या झालेल्या सईचा उपमर्द करताहात. आमच्यापेक्षा विजापूर आपल्याला जवळ वाटलं? त्याच विजापूरकरांच्या कृपेनं आपण दहा वर्षे तुरुंगात होतात हे विसरलात वाटतं?

**मुधोजी :** ते हाल सोसले म्हणूनच पुन्हा ती वेळ यायला नको यासाठी विजापूराकडे धावलो.

**बाबाजी :** मुधोजीराव ! आम्हाला काय शाही फरमानाची झळ लागली नाही, लागणार नाही असं आपल्याला वाटतं ? दादोजी तो शाही खलिता एकदा मुधोजीरावांना दाखवा. कोणत्या खाईत राजांची सोयरीक नसतानाही आम्ही आपण होऊन उडी घेतली ते एकदा मुधोजीरावांना कळू द्या.

**शिवाजी :** मामासाहेब ! केव्हाही कुणाही निरपराध्याला दहा वर्षे तुरुंगात खितपत पडायला लागू नये म्हणून आम्ही कमरा कसल्या आणि आपण केवळ त्या भीतीनं, त्या अन्यायी राजवटीविरुद्ध उभं राहणाऱ्यांना साहाय्य करायचं सोडून पुन्हा त्या राजवटीकडे धावलात ?

**बाबाजी :** हे अन्यायाकडेच न्याय मागण्यासारखं झालं.

**शिवाजी :** आम्ही स्वार पाठवले ते आपल्याला आणून आपले आशीर्वाद घेण्यासाठी. गिरफदार करून कैदी म्हणून आणण्यासाठी नव्हे.

**मुधोजी :** आमचा आशीर्वाद ! रोहिडेश्वरी शपथ घेताना नाही आठवण झाली त्याची ?

**बाबाजी :** आणि या गैरसमजानं आपण विनाकारण बेडचा ठोकणाऱ्या आदिलशाहीत बजाजीला पाठवलंत आणि आपणही निघालात ?

**शिवाजी :** महाराष्ट्रधर्म वाढवण्यासाठी आणि मराठा तितुका मिळवण्यासाठी आम्ही धडपडतो आहोत. क्षुल्लक मानापमान आणि गैरसमज या मराठ्यांच्या दुर्गुणामुळं बजाजीसारखा तरुण रक्ताचा मराठा आज बादशाही चाकरीत सुपूर्द केला जातो आहे. मामासाहेब ! रोहिडेश्वराचा मनसुबा खुद्द मासाहेबांना, दादाजीनासुद्धा माहीत नव्हता. यशानंतर यशाची वार्ता हाच योग्य मनसुबा असं आम्हाला वाटलं. चूक होतं ते ?

**मुधोजी :** (ओशाळून) आमचा गैरसमज चुकीचा होता राजे ! आम्ही आता आपले हाती आहोत. आमचे हवे ते...

**शिवाजी :** मामासाहेब ! आम्ही तुम्हाला कैद केलं नाही. आशीर्वाद द्यावात, निदान वेगळं राहून आमच्या कार्यात आड येऊ नयेत, एवढंच सांगायला आम्ही आपल्याला इकडे घेऊन आलो.

**मुधोजी :** आम्ही आपल्या कार्याच्या आड येणार नाही राजे !

**शिवाजी :** धन्यवाद ! मामासाहेब ! हाच आपला आशीर्वाद असं आम्ही समजतो. यावेळी बजाजी इथं हवे होते. ते आमचे मेव्हणे. आमचे कान पिळायला त्याना आमच्याकडे तरी पाठवायचं होतं मामासाहेब.

**तानाजी** (धावत प्रवेश करून) कान पिळायलाच काय पण पाय धरायला सुद्धा बजाजी आता इकडे येऊ शकणार नाहीत. कधीच येऊ शकणार नाहीत.

**शिवाजी :** का ?

**मुधोजी :** काय झालं बजाजीला ?

**बाबाजी :** काही दगाफटका ?

**दादोजी :** बघा राजे ! तुमच्या कार्याचा हा अनिष्ट......

**दादाजी :** अनिष्ट परिणाम ? राजांच्या कार्याचा ? नाही पंत ! हा......

**शिवाजी :** मामासाहेब ! हा आपल्या अधिऱ्या निर्णयाचा परिणाम ! तानाजी ! काय झालं ते तरी सांग ! बजाजींचं जे काही बरं वाईट...

**तानाजी :** जे वाईट झालं आहे ते सुधारण्यासारखं नाही राजे ! ते मरणापेक्षाही भयंकर आहे.

**शिवाजी :** म्हणजे ?

**तानाजी :** बजाजींना बादशहानी फसवून, सरदारी देतो म्हणून, तें प्रतिकार करीत असताना, बळजबरीनं मुसलमान केलं आहें. ज्याची बहीण शहाजीराजांच्या मुलाला दिली आहे, तो सरदार बाटवल्याच्या आणि राजे तुमच्या महाराष्ट्रधर्मं वाढवण्याच्या कार्याला शह दिल्याचा आनंद बादशाहानी भरदरबारात बोलून दाखवला आहे. आणि त्याच आनंदात बादशहानं आपली मुलगी – शहाजादी – बजाजीला दिली. निका मोठ्या इतमावानं लावला.

**मुधोजी :** (एकदम धक्का असह्य होऊन) काय? माझ्या बजाजीला मुसलमान केलं? आत्तापर्यंतच्या एकनिष्ठ शाहीनोकरीचं हें बक्षीस बादशाहानी आम्हाला दिलं? आता आमच्या जीविताला काय अर्थ आहे? मृत्यूसमयी पाणी देणारा पुत्र अशा तऱ्हेनं पारखा झाला. एकवेळ राजे तुमच्या कार्यांत तुम्हाला साहाय्य करताना बजाजीला मृत्यू आला असता तर तो आघात

सुद्धा आम्ही सहन केला असता. पण हा धर्मांतराचा आघात आम्हाला असह्य झाला आहे. स्वधर्मे निधनं श्रेयः । परधर्मो भयावहः ॥ हे वचन उच्चारणं आणि परक्याची चाकरी करणं, याचं हे आम्हाला प्रायश्चित्त मिळालं का? आता सईला काय वाटेल? तिचं दुःख मी कसं सहन करू? परमेश्वरा! महाराष्ट्र धर्म वाढवू इच्छिणाऱ्या या प्रयत्नशील राजावर हा आघात निर्घृणपणानं करवला कसा? बजाजी आम्हाला अंतरला. तो आता मेल्यातच जमा आहे. माझा निर्वंश झाला... मी हे कसं सहन करू? (हताश होऊन ग्लानी आल्यासारखे खाली कोसळतात. शिवाजी महाराज पुढे धावून त्याना सावरतात आणि आसनावर बसवतात.)

**शिवाजी** : मामासाहेब! येवढं हताश का होता? बजाजी मुसलमान केले गेले. बळजबरीनं मुसलमान केले जात असताना झगडून प्राणाहुती देण्या-ऐवजी जीवाच्या भीतीनं, फार तर आपण म्हणू शाहीऐश्वर्याच्या लोभानं, बादशहांचे जामात होण्याचं भाग्य मिळतं आहे, पुढे बादशाही मिळेल, या आशेनं बजाजी मुसलमान झाले हा फार तर आपण त्यांचा दोष समजू. पण—

**मुधोजी** : आता पण उरला आहेच कुठे?

**बाबाजी** : एकदा हिंदूचा मुसलमान झाला की तो आपणाला अंतरलाच.

**दादाजी** : तो आपल्याला पारखा झाला.

**येसाजी** : महाराज, आपला एक हिरा गळून पडला. स्वराज्य स्थापनेच्या कार्याला हा अपशकून झाला.

**तानाजी** : येसाजी! असं म्हणू नका. बजाजी मुधोजीरावांच्या आदेशाप्रमाणे विजापुरी गेले खरे. पण जाताना महाराजाना माझ्याजवळ सांगावा देऊन गेले की आयता उजळ माथ्यानं आदिलशाहीचा मित्र म्हणून दरबारी जातोच आहे. तेव्हा संधी साधून भेद काढून आणतो. त्यासाठी वाटेल ते करावे लागले तरी चालेल. पण शाहीतटाला फितुरीचं खिंडार पाडल्याशिवाय राहणार नाही.

**शिवाजी** : बघितलंत मामासाहेब! बजाजी मुसलमान झाले ते काही उद्देशानं! बादशहाचे जामात झाले तेही अशाच स्वराज्य स्थापनेसाठी कार्य करण्याच्या कल्पनेनंच.

**मुधोजी** : पण बजाजी शाहीवैभवात रंगून मुसलमानच राहिला तर–

**दादोजी** : तर नामुष्कीच. आणि राजे, याचा दोष तुमच्या माथी.

**बाबाजी** : मुसलमानाचा परत कुणी कधी हिंदू झाला आहे का?

**शिवाजी** : हा खुळेपणा सोडा! बजाजी मुसलमान झाले म्हणून काय झालं? ते आमचेच आहेत, आम्ही त्याना पारखे होऊ देणार नाही.

**येसाजी** : पण राजे! बजाजी मुसलमानाचे पुन्हा–

**शिवाजी** : हिंदू कसे होऊ शकतील असंच ना? याच खुळ्या समजुतीनं पूर्वी आपण महाराष्ट्रधर्माची नव्हे तर साऱ्या भारत वर्षाची हानी करून घेतली आहे. आम्ही तर ऐकलं आहे की कोकणात फिरंग्यानी विहिरीत भाकऱ्या टाकून ते पाणी पिणाऱ्या खुळ्या हिंदूना तुम्ही आता इसाई झालात म्हणून. त्या धर्मात जबरीनं सामावून घेतलं. आणि इतर हिंदूनी त्याना दूर लोटलं, म्हणून तेही अगतिकतेनं इसाई झाले. पण अजून घरी भजनपूजन मात्र आपल्या मूळ देवाचं करताहेत.

**तानाजी** : म्हणजे ते मनानं हिंदूच आहेत. तसे अनेक मुसलमानही हिंदूच आहेत. पण–

**शिवाजी** : लौकिकात ते हिंदू कसे ठरतील असंच ना? हिंदू असलेले मुसलमान होऊ शकतात, तर मग मुसलमान झालेला परत का म्हणून हिंदू होऊ शकणार नाही ? विचार करा बाबाजी, मामासाहेब, पंत आपलं माणूस परधर्मात जाणं किती भयंकर असतं याचं दुःख आज कळून आपले सर्वांचेच डोळे आज उघडले आहेत. पण झालं ते झालं म्हणून त्यांना दूर लोटून हातपाय गाळून स्वस्थ बसणं आपल्या स्वराज्यस्थापनेच्या कार्याला घातक ठरेल. आतापर्यंत अशा जबरीच्या धर्मांतरामुळं आपलेपणाला पारखे झालेल्या हजारोंनी या यातना भोगल्या असतील. हजारो भोगत असतील. याची आपल्याला आजपर्यंत जाणीव तरी होती का ?

**मुधोजी** : नव्हती राजे, नव्हती खरी ! पण ते दुःख आज स्वतःच्याच दाराशी येऊन भिडलं तेव्हा आमचे डोळे उघडले. आम्हीच या दुर्दैवी जिवाना गैर-समजानं खुळ्या समजुतीनं दूर लोटून त्यांना पारखं केलं.

**शिवाजी** : म्हणून आम्ही तुम्हाला वचन देतो मामासाहेब ! बजाजी आमच्यात

आल्याशिवाय आम्हाला चैन पडणार नाही. सुखाचा घास आम्ही गिळणार नाही.

**मुधोजी** : म्हणजे राजे तुम्ही बजाजींना–

**दादोजी** पुन्हा हिंदू करणार ?

**बाबाजी** : पण कसं शक्य होईल हे ?

**येसाजी** : हे सारेजण मानतील का ?

**दादोजी** असं पूर्वी कधी घडलं नाही.

**शिवाजी** : घडलं नाही ? दादोजी ! श्रीकृष्णानं नरकसुराच्या बंदीत असलेल्या सोळा हजार एकशे स्त्रिया भ्रष्ट म्हणून गैरसमजानं समाजानं त्यक्त ठरवल्या होत्या. पण त्यानासुद्धा यादव कुळात सामावून शुद्धीकरणाचा पहिला धडा भारतवर्षाला दिला आहे, तो काय केवळ ऐकण्यासाठी ?

**दादोजी** : राजे ? त्या देवादिकांच्या गोष्टी !

**शिवाजी** म्हणूनच त्या आदर्श आणि अनुकरणीय आहेत. म्हणूनच आम्ही प्रतिज्ञा करतो की आम्ही बजाजीना शुद्ध करून परत हिंदू केल्याशिवाय सुखाचा लवलेशही स्वीकारणार नाही. मंचकावर शयन करणार नाही. गोड पदार्थांना वर्ज्य मानून त्याचा एकही घास घेणार नाही.

(सारेजण या प्रतिज्ञेकडे भारावून पहात असताना हळूहळू प्रकाश कमी होतो. क्षणमात्र अंधार होतो. त्यात 'सद्धर्म रक्षक शिवाजी राजांचा जयजयकार असो' असा जयजयकार ऐकू येतो. पुन्हा प्रकाश येतो तेव्हा तोच महाल दिसतो. फक्त मध्यभागी असलेल्या खिडकीजवळ सत्यनारायणाची पूजा झालेली दिसते आहे. तानाजी, येसाजी, दादाजी, बाबाजी, मुधोजीराव आणि इतर सारे सरदार जमले आहेत. काही उभे, काही बसलेले. शिवाजी महाराज पूजेजवळ एका आसनावर बसले आहेत. चेहरा समाधानी आहे पण पूर्ण आनंदी नाही. सरदारांपैकी काहीजण पूजेला नमस्कार करून मागे सरताहेत.)

**शिवाजी** . विजापुरी शहाजीराजांना कैद झाली होती, तेव्हा आमच्या मासाहेबांनी सत्यनारायणाचा संकल्प सोडला होता. शिवपूजेसाठी शिखर शिंगणापुरासही आम्ही सारेजण जाऊन आलो. शहाजी महाराजांची सुटका झाली.

संकल्प पुरा केला पण अजून आमचं खरं समाधान नाही. अजून आम्हाला खरा आनंद मिळाला नाही, कारण–

**मुधोजी** : कारण आमचा बजाजी अजून आमच्यात आला नाही, असंच ना ? खरं आहे राजे, हे शल्य अजून सर्वांनाच सलतं आहे खरं.

**येसाजी** . आणि विजापुरात तर वार्ता आहे की बजाजी बादशहांच्या मुलीच्या पाशात एवढे गुरफटले आहेत की तेच त्यांना सुखाचं वाटून आता ते विजापूर सोडतील अशी आशा नाही.

**तानाजी** : पण अशीही वार्ता आहे की बादशहा बजाजींनाच सेनापती करून महाराज आपला मोड करायला पाठवणार आहेत.

**दादाजी** : आम्ही तर ऐकतो आहोत की ते मजल दर मजल करीत जवळ पोहोचलेही आहेत.

**शिवाजी** : या साऱ्या वार्ता आम्हाला कळल्या नाहीत असं आपणा सर्वांना वाटतं काय ? बहिर्जी नाईक एका शेतकऱ्याच्या वेषात येऊन प्रसाद घेऊन गेले. ते आम्हाला सांकेतिक भाषेत सारं सांगूनच गेले.

**बाबाजी** : (आश्चर्याने) ते बहिर्जी होते? महाराजांची धन्य आहे. एका ठिकाणी बसून साऱ्या महाराष्ट्राची आणि कर्नाटकाची वार्ता महाराज कशी मिळवतात याचं कोडं आत्ता उलगडलं.

**मुधोजी** : हो पण थोडंसंच ! कारण आत्ता इथं असलेल्या सरदारात कोणी बहिर्जी नसला म्हणजे मिळवली.

**बहिर्जी** : (मुसलमानी वेषात प्रवेशून) हमे भी पूजा की प्रसाद दीजिये! हम भी–

**येसाजी** : ए ऽऽ ! अरे, या मुसलमानाला इथपर्यंत कुणी येऊ दिला ?

**बहिर्जी** : (मिस्कील हसत) हम खुदही राजासाबका परवाना लेकर—

**तानाजी** : राजांची परवानगी ? अरे चल ! राजे इथंच आहेत आणि—

**बहिर्जी** परसाद को भी हम......

**बाबाजी** : जा बाबा जा ! राजे, तुम्ही स्वस्थ कसे ?

**शिवाजी** : तुम्ही सारेजण एका मुसलमानाला तो राजीखुषीनं प्रसाद माग-

तोय तर द्यायला तयार नाही, तर बजाजी मुसलमानाचें हिंदू होतो म्हणू लागले तर कशी मान्यता देणार याचा विचार करतोय मी.

**दादाजी :** म्हणजे महाराज ?

**बहिर्जी :** म्हणजे मी बहिर्जी बजाजींना घेऊन राजांच्या भेटीला आलो आहे. विजापुरात राजांच्या सांगण्याप्रमाणं त्याना ख्यालीखुशालीचं सोंग करायला लावून बादशहांचा विश्वास संपादन करवला आणि सेनापती म्हणून मीच 'शिवाजीचा मोड करतो' अशी प्रतिज्ञा करायला लावून सैन्यासकट इकडे घेऊन आलो. सैन्य दिलं आपल्या मावळ्यांच्या ताब्यात. या अल्ला ! या खुदा ! करीत दाढीचे केस उपटत बसले आहेत सारेजण. आणि--

**मुधोजी :** बजाजीला इकडं आणलंत? कुठं आहे बजाजी ?

**बहिर्जी :** राजांच्या आज्ञेची वाट पाहात आहेत.

**शिवाजी :** बहिर्जी, जा घेऊन ये त्यांना. (बहिर्जी जातो.)

**मुधोजी :** राजे,बादशहानी बजाजीला आपला मोड करायला इतक्या विश्वासानं धाडलं ?

**शिवाजी :** बादशहांची मर्जी उतरली की आमच्यावर बळी द्यायला सरदाराला पाठवायचं असा शिरस्ता बादशहाने पाडला आहे असं बहिर्जींनीच आम्हाला सांगितलं.

**येसाजी :** म्हणजे ?

**शिवाजी :** बजाजीच्या पत्नी शहाजादीसाहेब मरण पावल्या आणि बादशहांच्या मर्जीतून बजाजी उतरले. ते आमच्यावर पाठवले जाणार हे ठरले ते कळल्यावर प्रतिज्ञेचं सोंग करून बजाजींनी आपली तिथून सुटका करून घेतली आणि थोड्या सैन्यासह इकडे कूच केलं.

**बाबाजी :** वा :! म्हणजे बादशहाचं तेवढं सैन्यही तावडीत सापडलं आणि--

**बहिर्जी :** बजाजीराव आले आहेत महाराज.

(बजाजी मुसलमानी पागोटे, खुरटी दाढी, पायघोळ अंगरखा अशा वेषात प्रवेश करून, धावत जाऊन शिवाजी महाराजांचे पाय धरतात. स्फुंदू लागतात. अश्रूंनी शिवाजीराजांचे पाय भिजू लागतात)

**शिवाजी :** उठा बजाजी! झालं ते होऊन गेलं. नशिबात असेल ते टळत नाही. तुम्ही परत आलात, आम्हाला सगळं मिळालं.

**बजाजी** : महाराज! मी देहानं बाटलो, पण मनानं बाटलो नाही महाराज ! मुसलमान म्हणून मला मरू देऊ नका. मी सईचा भाऊ आपला मेहुणा आहे. पण आज माझा कान पिळायचा अधिकार आपला आहे. माझ्या महादजीचा त्या माझ्या पोरक्या पोराचा विचार करा. त्याच्यावर दया करा आणि मला परत घेणं शक्य नसलं तर आपल्या हातानी आपण आमचा शिरच्छेद करा. आपण दिलेल्या या देहांत प्रायश्चित्तानं तरी आम्ही मेल्यावर का होईना आमचा देह हिंदू होईल.

**शिवाजी** : (बजाजींच्या पाठीवरून हात फिरवीत) बजाजी शांत व्हा! तुम्ही आमचेच आहात. अहिल्या देहानं भ्रष्ट झाली पण मनानं नाही, म्हणून काही-काळ शिलास्वरूप होऊन शेवटी रामपदस्पर्शानं ती पावन झालीच ना ? आपल्याच पुराणांनी दिलेली ही पतितपावनाची शिकवण आपण विसरणार आहोत का ? आमची माणसं आम्हाला जड नाहीत. आणि आमच्या माणसांनाच आम्हाला पावन करून जर आम्हाला महाराष्ट्रधर्म वाढवता येत नसला तर आमची प्रतिष्ठा, आमची प्रतिज्ञा, आमच्या कार्याचं सारं स्वरूप, सारा जोम वेगडी ठरेल. तुम्ही मुसलमान झालात परिस्थितीच्या फेऱ्यात सापडून. हा तुमचा दोष नाही. आमच्या परीक्षेसाठीच नियतीनं हा प्रसंग आणला असेल. काळजी करू नका. यातूनही आम्ही मार्ग काढायचा निश्चय केला आहे. येसाजी ! आम्ही पलीकडच्या दालनात शास्त्री पंडितांना बोलावलं आहे. त्यांना इकडे बोलावून घ्या. ('जशी आज्ञा' म्हणून येसाजी जातो)

**बाबाजी** : शास्त्री पंडित आपल्या शुद्धीकरणाच्या कल्पनेला साथ देतील असं वाटतं राजे आपल्याला?

**मुधोजी** : परधर्मात गेलेल्याला आतापर्यंत हिंदू धर्मात येण्याची परतीची वाट बंद झालेली असते, अशी रूढी आहे राजे! ती मोडून–

**शिवाजी** : मामासाहेब ! शास्त्री पंडितांच्या कानावर आमची इच्छा कालच घातली आहे. बजाजी बळजबरीनं मुसलमान केले गेले आहेत. त्यांना परत हिंदू धर्मात घ्यायची आमची इच्छा आहे. तुम्ही यावर शांतपणे निर्णय घ्यावा

असं आम्ही त्यांना कालच सांगितलं आहे. बहिर्जीनं आज बजाजी इथं येणार आहेत म्हणून आमच्या कानावर आधीच घातलं होतं. म्हणून आज आम्ही त्यांना इथं बोलावलं आहे.

**येसाजी** . (प्रवेशत) महाराज! गंगाधरशास्त्री, काशिनाथपंडित, धुरंधर-शास्त्री आणि बाळंभट आले आहेत. त्यांना इकडे बोलावलं आहे.

**शिवाजी** : (आसनावरून उठत) यावं यावं गंगाधरशास्त्री, काशिनाथपंडित यावंत. धुरंधरशास्त्री, बाळंभटांनाही घेऊन आलात हे चांगलं केलंत. बसावं या आसनावर, (सर्व शास्त्री पंडित यथायोग्य आसनांवर बसतात। आम्ही आपल्याला काल आमची इच्छा सांगितली. त्यावर आपण काही निर्णय घेतलात ?

**गंगाधरशास्त्री** : महाराज! धर्म बदललेल्या माणसाला परत धर्मात घेणं अशक्य नाही हे खरं पण—

**काशिनाथपंडित** · पण ते रीतिरिवाजास सोडून आहे.

**धुरंधरशास्त्री** : म्हणून ते उचित नाही. काय बाळंभट ?

**बाळंभट** : हो! असा आमचा एकमुखो निर्णय आहे.

**शिवाजी** : हा आपला निर्णय आम्हाला अपेक्षितच होता. आणि रीतिरिवाजा-प्रमाणं तो योग्यही वाटण्यासारखा आहे.

**गंगाधरशास्त्री** . म्हणजे मग या प्रकरणाचा निकाल लागला असं म्हणायला प्रत्यवाय नसावा.

**धुरंधरशास्त्री** · नसावा नव्हे नाहीच. ठाम नाही.

**काशिनाथपंडित** · शंकेला जागा असल्यासारखं नसावा का म्हणता गंगाधर-शास्त्री?

**बाळंभट** : अगदी बरोबर ! शास्त्रात रूढिर्बळियसि !

**धुरंधरशास्त्री** : धर्मशास्त्रही शेवटी रूढीला मान देतंच.

**शिवाजी** अगदी खरं ! पण—

**गंगाधरशास्त्री** : पण ? आता पण उरलाच कुठे ? पण परंतुला रीतिरिवाजात जागा नाही.

**शिवाजी** : धर्मनिर्णय चुकीचा मानणं बरोबर नाही यात शंका नाही. पण रूढी म्हणून पंडितांनी थिजवलेला, गोठवलेला धर्म मात्र आम्हाला मान्य नाही. तो केवळ धर्महीन हट्ट आहे, आंधळेपणा आहे. मानवतेचा अपमान आहे.

**गंगाधरशास्त्री** : धर्महीन हट्ट ?

**धुरंधरशास्त्री** : आंधळेपणा ?

**बाळंभट** : रूढी म्हणजे थिजलेली धर्माचरणं ?

**काशिनाथपंडित** : आणि शिवाय मानवतेचा अपमान ?

**धुरंधरशास्त्री** : यातून आम्हीही धर्महीन ठरतो काय ?

**शिवाजी** नाही ! तुम्ही नाही तुमचा हट्ट धर्महीन आहे रूढीच अमानुष आहे.

**गंगाधरशास्त्री** . पण बजाजींना मुसलमानाचे पुन्हा हिंदू करून घेण म्हणजे रूढीभंग.

**बाळंभट** · म्हणजेच धर्मकार्यात ढवळाढवळ.

**शिवाजी** : धमकार्यात ढवळाढवळ करण्याची आम्हाला इच्छा नाही. पण परिस्थितीप्रमाणे, माणसाच्या बदलाप्रमाणे प्रगतीला हातभार लावण्यासाठी जो धर्म वाढीला लागतो तो खरा धर्म. आपला धर्म आपण विशाल मानतो. पण त्यानं जाणाऱ्यांप्रमाणं येणाऱ्यानंही दार मोकळी ठेवली पाहिजेत. नाहीतर काही काळातच आपला धर्म नामशेष होईल.

**गंगाधरशास्त्री** : राजे ! राज्य चालवणं निराळं आणि धर्म आचरणं निराळं. धर्माचा अर्थ आपण म्हणता इतका सोपा असू शकत नाही.

**शिवाजी** : (तीव्र स्वरात) विशालधर्म म्हणजेच मानवधर्म तो सोपाच आहे. तोच माणसाला ज्ञानी करतो. रूढी मात्र माणसाना अज्ञानाच्या अंधारातच चाचपडत ठेवतात. अशा धर्मनिष्ठांची गत हत्ती चाचपून काय आहे ते ठरवणाऱ्या वेडगळ आंधळ्यांसारखी असते. खऱ्या धर्माची चाड असणाऱ्यांना ज्ञानेश्वरी सुचली आणि अशांच्याच घरी भगवंतानी पाणी भरलं, अशानाच अत्यजा घरी अन्नग्रहण केल्यानं धर्म बुडाला असं वाटल नाही. पण या साऱ्याना जन्मभर छळ सोसावा लागला. माणुसकी विसरतो आणि जवळ आलेल्याला दूर ढकलतो तो धर्म नाही ती आंधळी रूढी आहे.

**धुरंधरशास्त्री** : राजे ! हा धर्म निर्णयाचा अपमान होतो आहे.

**गंगाधरशास्त्री** : धर्माचं स्थान राजस्थानापेक्षा जास्त वरच्या दर्जाचं आहे.

**काशिनाथपंडित** : आपण धर्माची अप्रतिष्ठा करू नका.

**बाळंभट** : आणि आम्हाला भलता आग्रह करून पापकर्दमातून लोटू नका.

**शिवाजी** : धर्माची प्रतिष्ठा ? हिंदू देवालये फोडली, भ्रष्ट झाली तेव्हा कोठे गेली होती ही प्रतिष्ठा ? तेव्हा तर पळ काढून जीव वाचवले अनेक तथाकथित धर्माभिमान्यानी.

**धुरंधरशास्त्री** : ती सत्तेपुढे शहाणपणाची शरणागती होती राजे.

**शिवाजी** : हे सांगायला तुम्हाला खंत वाटत नाही. आणि बजाजीला हिंदू करून घ्यायला सांगितलं तर मात्र धर्मनिर्णय त्याच्याविरुद्ध उभा राहातो ? यावनी वर्षासन घेण्यानं तुम्ही धर्मभ्रष्ट होत नाही. शतजन्माची पापं एका गंगास्नानानं धुतली जातात. आणि बळजबरीनं मुसलमान केलेला बजाजी शुद्ध होऊन हिंदू होऊ शकत नाही ? शास्त्रीबुवा, उगीच नाही महाराष्ट्रधर्माला ओहोटी लागली. पुन्हा विचार करा आणि निर्णय द्या. आणि तरीही निर्णय विरुद्ध असेल तर—

**गंगाधरशास्त्री** : तर काय ?

**शिवाजी** : राजाज्ञेच्या सत्तेपुढे तुमच्या शहाणपणाला वाकवणं आणि आम्ही म्हणतो तसं करवून घेणं आम्हाला भाग पडेल. खरा धर्म तोच की जो इतर धर्माबरोबर माणसाकडेही सहिष्णुतेनं पाहातो आणि चुकल्यामाकल्याला क्षमा करून परत पदराखाली घेतो.

**गंगाधरशास्त्री** : राजे ! आपण आज जिंकलीत. राजधर्म आपण खरा जाणलात रूढीबद्ध धर्म म्हणून आंधळेपणानं वावरणाऱ्या तथाकथित धर्माकडून तुडवल्या जाणाऱ्या समाजाला आज तुम्ही योग्य दिशा दाखवलीत.

**धुरंधरशास्त्री** : यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति ! अशावेळी आपणासारखा मर्मज्ञच धर्म संस्थापना करेल अशी आमची खात्री पटली.

**बाळंभट** : श्रीकृष्णाची गीता आपण आचरत आहात आम्ही केवळ ती म्हणतो.

**काशिनाथपंडित** : राजे ! बजाजी प्रायश्चित्त घ्यायला तयार असतील तर

त्यांना परत आपल्या धर्मात घेता येईल.

**शिवाजी :** जरूर प्रायश्चित्त घेतील. ते तर केव्हाच तयार आहेत.

**गंगाधरशास्त्री :** मग महाराज ! आम्ही सर्व शास्त्री पंडितातर्फे निर्णय देतो की बजाजींना शुद्ध करून आम्ही हिंदू धर्मात घ्यायला तयार आहोत.

**शिवाजी :** शास्त्रीबुवा ! हाच तुमच्या मनाचा मोठेपणा ! आपण आपला धर्म वाहात्या पाण्यासारखा निर्मळ ठेवलात संतोष वाटला. हाच धर्म समाजातल्या अनिष्ट रूढी मोडायला आणि समाज विकासाला कारण होतो मानवतेची प्रतिष्ठा सांगणारा हाच खरा धर्म. या पुढं जे जे बजाजीसारखे दुर्दैवी जीव आपल्याकडे धावतील त्याना दिलासा द्या. परत आपल्यात घ्या आणि आमच्या महाराष्ट्रधर्म वाढवण्याच्या कार्याला हातभार लावा हीच आपल्याजवळ नम्र प्रार्थना आहे. तसेच घडेल अशी खात्री आहे.

**चौघेही शास्त्रीपंडित :** तथास्तु ! तथास्तु !

(सर्वजण आनंदाने जयजयकार करतात— महाराष्ट्रधर्मसंवर्धक शिवाजी राजांचा जयजयकार असो.)

पडदा पडतो.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. [illegible] नों. दि [illegible]
वि. [illegible] क्र. ............



IRBK-0115563